**चिपळूण नगर परिषद**

निविदा सुचना

(बांधकाम विभाग/योजना)

चिपळूण नगर परिषदेचे संगणक विभाग मध्ये फर्निचरसाठी लागणारे साहित्य काय दराने पुरवाल हे दर दोन लखोटा पध्दतीने सिलबंद निविदा मागविणेत येत आहे. इच्छुक योग्य पात्रताधारकांनी त्यांच्या सिलबंद निविदा दिनांक १८/१२/२०१० रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत प्रशासकिय अधिकारी, चिपळूण नगर परिषद यांचे कक्षामध्ये ठेवलेल्या टेंडर पेटीमध्ये टाकवयाची आहे.

| **अ.क्र.** | **कामाचा तपशिल** | **बयाणा रक्कम** | **आवश्यक पात्रता सर्वांसाठी** | **फॉर्मची किंमत** |
|---|---|---|---|---|
| १ | चिपळूण नगर परिषदेचे संगणक विभागास फर्निचरसाठी लागणारे साहित्य काय दराने पुरविणार,<br>१ काउंटर टेबल, टॉप व्हर्टिकल प्लाय L टाईप 18 mm व त्या टेबलाला सहा ड्रॉव्हर व किबोर्ड. १८ व ९ mm ply ( साईज २० फुट ३ फुट २ फुट खोली ) L टाईप प्लाय साईज दीड फुट बाय एक फुट)<br>२.अे)केबीन पार्टियशन (१२ फुट बाय १० फुट.)<br>ब) केबीन पार्टिशन (साडेसात बाय १२ फुट ) मध्यभागी ग्लास ५ mm. प्लाय ९ mm. केबीन डोअर गलास व लाकुड फ्रेम.(७ फुट बाय ३ फुट )<br>३) मध्यभागी साईड पार्टिशन ९ mm प्लाय व साईड फ्रेम सागवानी ( साडे ९ बाय ५ फुट)<br>४) ऑफिस चेअरच्या शेजारी पार्टीशन साईड फ्रेम सागवानी ( ७ फुट बाय ५ फुट ) | ५०००/- | १.साहित्य पुरवठा संबंधी नगर परिषद हद्दीतील/अथवा महानगर पालिका हद्दीत दुकाने व आस्थापना कायदयाखाली रजिस्ट्रेशन<br>२.वॅट रजिस्ट्रेशन<br>३.अनुभवाचा दाखला आवश्यक | ५००/- |

१. निविदा फॉर्म मिळण्याची शेवटची तारीख १५/१२/२०१० पर्यंत म्यु.पल एक खिडकी विभागात सायं. ५.०० पर्यंत मिळतील.
२. निविदा सादर करण्याची अंतीम तारीख १८/१२/२०१० वेळ दुपारी २.०० वाजेपर्यंत प्रशासकिय अधिकारी, चिपळूण नगर परिषद यांचे कक्षामध्ये ठेवलेल्या टेंडर पेटीमध्ये टाकावयाची आहे.
३. निविदा उघडण्याची अंतीम तारीख १८/१२/२०१० वेळ सायंकाळी ४.३० वाजता चिपळूण नगर परिषद कार्यालयामध्ये उपस्थित ठेकेदार यांचे समक्ष उघडणेत येतील. उशीरा आलेल्या पोष्टाने/कुरीयरने आलेल्या निविदा स्विकारण्यात येणार नाहीत. कामासंबधी नकाशे अंदाजपत्रक व माहिती नगर परिषद बांधकाम विभागात पहावयास मिळेल. सविस्तर निविदा सुचना नगर परिषदेच्या अभिलेख व भांडार विभागात मागणी केल्यास विनामुल्य उपलब्ध आहेत. किंवा नगर परिषद नोटीस बोर्डवर पहावयास मिळेल. कोणतेही सर्व अथवा एक निविदा स्विकृत अथवा अस्विकृत करण्याचे अंतिम अधिकार मुख्याधिकारी, चिपळूण नगर परिषद यांजकडे राखून ठेवणेत येत आहेत.

निविदा सुचना क्रमांक १०१२००१२

दिनांक : ०६/१२/२०१०

**मुख्याधिकारी अध्यक्ष**

**चिपळूण नगर परिषद**

टीप : सविस्तर निविदा सुचना नगर परिषदेचे www.cmcchiplun.org या वेबसाईटवर पहावयास मिळेल.

## सविस्तर निविदा सुचना

अटी शर्तीः-

१. निविदेमधील तपशिलानुसार मालाचा पुरवठा १५ दिवसांत सुस्थितील करण्याच्या शर्तीवर हुकूम करण्याची जबाबदारी लिहून देणार याची राहील.
२. पुरवठा करण्यात येणारे साहित्य हे नगर परिषद संगणक विभागामध्ये फिटींग करून देणे बंधनकारक आहे.
३. निविदे मधील तपशिलानुसार मालाचा पुरवठा करण्याचे बाबत लिहून घेणार चिपळूण नगरपरिषद यांना पूर्ण अधिकार राहील.
४. निविदे मधील शर्तीनुसार मालाचा पुरवठा न केल्यास लिहून देणार यांचे विरुध्द कायदेशीर कार्यवाही करण्याचा अधिकार लिहून घेणार यांस राहील.
५. विहीत मुदतीत निविदेनुसार मालाचा पुरवठा न केल्यास नगर पालिकेस फेर निविदा काढावी लागल्यास व त्यामुळे चिपळूण नगरपालिकेला जास्त आर्थिक भार पडल्यास किंवा आर्थिक हितास बाधा आल्यास त्याची पूर्ण भरपाई लिहून देणार यांचेवर राहील व ती विना तक्रार लिहून देणार यांनी करावयाची आहे. त्यामुळे निविदे सोबत भरलेले डिपॉझिट नगर पालिका फंडात जमा होईल.
६. लिहून देणार यांचे कोणत्याही कृतीने उपरोक्त कामात नगर परिषदेचे आर्थिक हितास बाधा आल्यास नुकसान झाल्यास त्याची संपूर्ण भरपाई करुन देण्यासाठी लिहून देणार तसेच त्यांचे पश्च्यात त्यांचे कायदेशीर वारसदारावर राहील.
७. शर्तीनुसार मालाचा पुरवठा न केल्याचे केव्हाही निदर्शनास आल्यास संपूर्ण नुकसान भरपाईची जबाबदारी लिहून देणार यांची राहील.
८. निविदे मधील विहीत मुदतीत मालाचा पुरवठा न केल्यास मुदत संपलेपासून पुढे होणा-या विलंबासाठी प्रत्येक दिवसांसाठी दंड म्हूणन रक्कम रुपये १००/- प्रमाणे लिहून देणार यांनी भरणेचा आहे.
९. कोणताही वाद निर्माण झाल्यास नगर परिषदेचा निर्णय अंतीम राहील व तो लिहून देणार यांचेवर बंधनकारक राहील.
१०. लिहून देणार यांनी निविदा कामाचे मुदतीत मालाचा पुरवठा करणेचा आहे तरी मालाचा पुरवठा न केल्यास सदर काम वरील अटी प्रमाणे कार्यवाही करणेचा अधिकार नगर परिषदेस राहील.
११. लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना मालाचा पुरवठा करण्याच्या संदर्भात देतील त्या सर्व सूचनांचे पालन करण्याचे बंधन राहील.
१२. लेखा परिक्षणात सदर कामी कोणताही आक्षेप आल्यास अगर जादा रक्कम प्रदान झाल्याचे आढळल्यास ती रक्कम भरणेस मी तयार आहे.
१३. बिलातून नियामाप्रमाणे सिक्युरिटी डिपॉझिट कापून घेण्याचा अधिकार मुख्याधिकारी यांस राहील.
१४. बिलातून नियमाप्रमाणे आयकर व वॅट कापून द्यावा लागेल
१५. निविदा दराप्रमाणे पुरविलेल्या मालाच्या दरामध्ये वाढ झाल्यास कोणत्याही प्रकारची दरवाढ देण्यात येणार नाही.

मुख्याधिकारी
चिपळूण नगर परिषद